# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/४३७१

दिनांक : २२/१०/२०१८

**तातडीचे/महत्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विषय - शिष्यवृत्ती योजनांची महा—डीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेबाबत तसेच Institute Profile ला मान्य झालेल्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने तात्काळ मान्यतेसाठी पाठविणेबाबत..

संदर्भ - शासन पत्र क्र. ससं/उशि/पुवि/शिष्यवृत्ती/२०१८/२५८७ दि. २०/१०/२०१८

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, मान्यताप्राप्त व्यवसायिक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी ''राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना'' व ''डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना'' तसेच मागासवर्ग प्रवर्गासाठीच्या शासनाच्या विविध शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजना https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

ज्या महाविद्यालयांचे Institute Profile मान्य झालेले आहेत अशा महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती आवेदनपत्र ऑनलाईन सादर करण्याचे कामकाज अव्याहतपणे सुरू ठेवावे. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालय/संस्थास्तरावर माहितीगार व्यक्तीची नेमणूक करावी. सोबत शासन पत्राची प्रत जोडत आहे. तरी, शासनाने दिलेल्या सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी.

कळावे,

आपला,
२२/१०/२०१८
उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत :— माहितीसाठी

मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग,पुणे १**

Web:www.jdhepune.info E_mail - jdhepune@gmail.com

फोन नं.020-26127833/26051632 फॅक्स नं. 020-26051632


क्र.ससं/उशि/पुवि/शिष्यवृत्ती/२०१८/ 2587 दि.२०/१०/२०१८

**महा-डीबीटी- विद्यार्थी आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने तात्काळ सादर करणे.**

प्रति,
प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
पुणे/अहमदनगर/नाशिक.

विषय:- शिष्यवृत्ती योजनांची महा-डीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेबाबत तसेच Institute Profile मान्य झालेल्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने तात्काळ मान्यतेसाठी पाठविणेबाबत...

संदर्भ:- या कार्यालयाकडील क्र.ससं/उशि/पुवि/शिष्यवृत्ती/२०१८, दि.०१/१०/२०१८, दि.११/१०/२०१८ व दि.२०/१०/२०१८.
मा.संचालनालयाकडील परिपत्रक क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/१७५८१, दि.१३/१०/२०१८.

उपरोक्त विषयाचे संदर्भात या कार्यालयाकडील उक्त विषयाची वेळोवेळी निर्गमित झालेली परिपत्रके कृपया अवलोकनी घ्यावीत.

मा.शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडील संदर्भिय दि.१३/१०/२०१८ चे परिपत्रक या कार्यालयाच्या www.jdhepune.info या संकेतस्थळावर अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

महा-डीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अशासकीय महाविद्यालयांच्या विविध शिष्यवृत्त्यांचे आवेदनपत्र सादर करणे व शिष्यवृत्ती वितरणापर्यंतची कार्यवाही करण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे.

महाविद्यालयाकडील प्रस्तुतचे कामकाज करण्यासाठी सर्वप्रथम महाविद्यालयांचे Institute Profile या कार्यालयाकडून मान्य करुन घेणे आवश्यक आहे. यास्तव वेळोवेळी या कार्यालयाने स्वतंत्र प्रशिक्षण कार्यक्रमाचे तसेच प्रोफाईल मान्यतेसाठी जिल्हानिहाय शिबीराचे आयोजन करुन प्रोफाईल मान्यतेचे कामकाज केले आहे.

ज्या महाविद्यालयांचे Institute Profile मान्य झालेले आहे, अशा महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती आवेदनपत्र ऑनलाईन सादर करण्याचे कामकाज अव्याहतपणे सुरु ठेवावे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालय/संस्थास्तरावर स्वतंत्र माहितीगार व्यक्तीची नेमणूक करावी.

विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र महाविद्यालयस्तरावरुन अचूकपणे पडताळणी करुन प्राचार्यांनी या कार्यालयास मान्यतेसाठी सादर करावेत. Clerk Login मध्ये प्राप्त झालेले Students Application मध्ये अभ्यासक्रम, वर्ग, शुल्क, अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र-कालावधी-प्राधिकार, उपस्थिती, गुणपत्रक आदी बाबींची योग्य ती खातरजमा करण्यात यावी. तसेच प्रस्तुत तपशीलासाठी आवश्यक Documents Upload असणे आवश्यक आहे. या बाबी तपासून Clerk Login मधून Principal Login साठी मान्यतेकरीता पाठविणे आवश्यक आहे. Principal Login प्राप्त झालेले Applications या कार्यालयाकडे Scrutiny या Tab मधून Send for Approval करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत महाविद्यालयांकडील Students Applications ची संख्या अत्यल्प आहे. यामुळे शासनाने या प्रकरणी नाराजी व्यक्त केली असून, जिल्हास्तरावर मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील प्रस्तुत योजनेच्या अनुषंगाने आढावा बैठकीत याबाबत गतिमानता आणण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांकरीता उत्पन्न व अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य आहे. या प्रमाणपत्रांच्या प्राप्तीसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी संबंधीत तहसिलदार कार्यालयामार्फत शिबीर आयोजन करुन, उत्पन्न व अधिवास दाखले उपलब्ध करुन देण्याच्या सूचना, या कार्यालयाकडील पत्र क्र.शिससं/उशि/पुवि/२०१८-१९/शिष्यवृत्ती/२३३८, दि.१४/०९/२०१८ रोजी आपणांस देण्यात आलेल्या आहेत. याबाबत संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालयास संपर्क करुन, समन्वयाने शिबीर आयोजन करण्याची कार्यवाही करावी.

महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रस्तुत प्रकरणी Students Applications बाबत दैनंदिन आढावा घेऊन, विद्यार्थ्यांना येत असलेल्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत.

शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेला एकही विद्यार्थी महाविद्यालयाच्या दिरंगाईमुळे वा मार्गदर्शनाअभावी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी खुदद प्राचार्यांनी घ्यावी.

(डॉ.विजय नारखेडे)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

प्रत:-
मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७
२/- यांना कळविण्यात येते की, संलग्नित महाविद्यालयांना विद्यापीठस्तरावरुन स्वतंत्र परिपत्रकान्वये आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्यात याव्यात.